# फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या बातम्या

सौरभ पालकर, अमित दळवी व गौतमी जोगळेकर




## कन्व्हेंशन हॉटेल निवडायचा पहिला चान्स देणगीदारांना!

आमच्या हॉटेल समितीने आतापर्यंत फिलाडेल्फिया कन्व्हेन्शन सेंटरला जोडून किंवा अगदी जवळ असलेल्या नामांकित पाच हॉटेलांत १२०० च्यावर खोल्या सवलतीच्या दरामध्ये आरक्षित केल्या आहेत. १ डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत हॉटेल निवडायचा पहिला एक्स्ल्यूसिव्ह चान्स केवळ देणगीदारांना मिळेल.

१ जानेवारीपासून सर्वांना अधिवेशनाच्या वेबसाईटवरून नोंदणी करता येईल. त्याआधी देणगीदारांव्यतिरिक्त इतर कोणालाही ह्या १२०० खोल्या आरक्षित करता येणार नाहीत. **ऑनलाईन नोंदणी केल्यावर मिळालेला कन्फर्मेशन नंबर घेऊनच आपल्याला मोजक्या हॉटेल रूम्सचे सवलतीच्या दरामध्ये बुकिंग करता येणार आहे. त्यामुळे, लवकरात लवकर रजिस्ट्रेशन करून जवळची हॉटेल्स फूल होण्याआधी मिळवा व निराशा टाळा.**

ह्या १२०० खोल्यांसोबतच हॉटेल समिती अजून २०० ते २५० बजेट हॉटेल्समधील खोल्या बुक करीत आहे. १ जानेवारीनंतर उरलेल्या सर्व खोल्या सर्वांना रजिस्ट्रेशन केल्यानंतरच मिळू शकतील.

**अधिक माहितीसाठी पहाः www.BMM2009Philadelphia.org**

## अधिवेशनाची नोंदणी (रजिस्ट्रेशन) १ जानेवारीपासून!

बी.एम.एम. अधिवेशनाची नोंदणी जरी १ जानेवारीपासून सुरू होणार असली तरी देणगीदारांसाठी खास लवकर हॉटेल बुकिंग सुरू झाले आहे. ज्यांनी आपली देणगी आतापर्यंत दिली आहे त्या सर्वांनी या संधीचा फायदा घ्यावा. निधीसंकलन समिती सर्व देणगीदारांशी जातीने संपर्क करून रजिस्ट्रेशन कन्फर्मेशन नंबर देत आहे. मात्र १५ डिसेंबरपर्यंत त्यांच्याकडून आपल्याशी संपर्क न झाल्यास, देणगीदारांनी स्वतः पुढाकार घेऊन उपरोल्लिखित फोन नंबर्सवर कॉल करावा. देणगीदारांना रजिस्ट्रेशन कन्फर्मेशन नंबर मिळाल्यानंतर तातडीने आपल्याला पाहिजे त्या हॉटेल्समधल्या रूम्स बुक करणे ह्याची सर्व जबाबदारी देणगीदारांची राहील ह्याची नोंद घ्यावी.

आपल्याला देणगी द्यायची असेल तर कृपया निधीसंकलन समितीच्या श्री. जगदीश वासुदेव (फोनः ६०९ ३३२ ०३९७) किंवा श्री. मंगेश होनवाड (फोनः ६१० २९९ १५५५) ह्यांना कॉल करा व आपला रजिस्ट्रेशन कन्फर्मेशन नंबर त्याच्याकडून घेऊन ३१ डिसेंबरच्या आधी हॉटेल्स बुक करा. १ जानेवारीनंतर शिल्लक सर्व रूम्स सर्वसाधारण सदस्यांना उपलब्ध होतील. जवळच्या हॉटेल्सची अधिक माहिती आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रचंड भाववाढ होऊनसुद्धा सर्वांना आणि विशेषतः जेष्ठ नागरिकांना व लहान मुले असलेल्या कुटुंबाना परवडावे असे प्रवेश शुल्क **मोठयांसाठी फक्त १५० डॉलर्स आणि मुलांसाठी ९९ डॉलर्स** ठेवण्यात आले आहे. त्यामुळे बऱ्याच लोकांना या अधिवेशनात सहभागी होता येणार आहे.

Early Bird नोंदणी म्हणून पहिल्या **१०००** नोंदणी करण्याऱ्या मंडळींना स्टेज जवळच्या आरक्षित जागांमधे बसून कार्यक्रमांचा आस्वाद घेता येईल. पहिल्या १००० जागांची नोदणी झाल्यानंतर मात्र स्टेज जवळच्या आरक्षित जागांचे नोंदणी शुल्क १७५ डॉलर्स पडेल. अनरक्षित जागांचे शुल्क **१५०** डॉलर्स राहील. अन्नधान्याची अभूतपूर्व भाववाढ गेल्या १ वर्षात झाली तरीपण वाटाघाटींचे तट लढवून सुग्रास भोजन केवळ **१००** डॉलर्समध्ये आम्ही देऊ शकू. मात्र फेब्रूवारी–मार्चपर्यंत जर झालेली भाववाढ कमी झाली नाही, तर नाईलाजास्तव आम्हाला फूड पॅकेजची किंमत २५ डॉलर्सने वाढवावी लागेल. अर्थातच ही भाववाढ त्यानंतर रजिस्ट्रेशन करणाऱ्यांनाच लागू होईल.

या अधिवेशनाचं अजून एक वेगळेपण म्हणजे २ जुलै रोजी होणाऱ्या CME मध्ये मेडीकल बरोबरच अजून बऱ्याच उपशाखांचा समावेश केलेला आहे. त्यांचे नोंदणी शुल्क पुढीलप्रमाणे आहे.

डेंटल, मेडिकल – $१५०

ओ.टी., पी.टी, फार्मसी, व्हेटरीनरी – $१००

या कॉन्फरन्समध्ये भाग घेण्याऱ्या सर्वांना credits मिळवण्याचीही सोय केलेली आहे.

याच बरोबर ५५+ लोकांसाठी Graceful Aging हा खास उपक्रम **विनामूल्य** ठेवण्यात आला आहे.

## ऐका हो ऐका...भारतातून एकापेक्षा एक धडाकेबाज कार्यक्रम येत आहेत हो SSS - सौरभ पालकर आणि अमित दळवी

"काय पुढच्या वर्षी कन्व्हेन्शनला जाणार का?" ह्या प्रश्नाला काही चतुर लोकांचे उत्तर होते "कोणते कार्यक्रम आहेत ते बघून सांगतो". पण आता वाट बघायची गरज नाही; कारण आमच्या कार्यक्रम निवड समित्यांनी अथक परिश्रम घेऊन असले तडाखेबंद कार्यक्रम आणले आहेत म्हणून सांगू...शपथ! आम्हाला गप्पच बसवेना...तर त्यातील काही रोमहर्षक कार्यक्रमांची आतल्या गोटातील माहिती द्यायला आहे हा आमचा खटाटोप. हा अंक वाचून आमच्याप्रमाणेच तुम्हालाही रजिस्ट्रेशन लवकरात लवकर करण्याची घाई होईल. नाटक-सिनेमे "फर्स्ट डे फर्स्ट शो" बघणारे आपण लोक, आपले काही मिस व्हायला नको असा विचार इकडेही नाही का करणार? मात्र ही आहे फक्त एक झलक. भारतातून येणारे उरलेले कार्यक्रम आणि उत्तर अमेरिकेतल्या सर्व कार्यक्रमांची सविस्तर माहिती पुढल्या अंकात असेल.

**सुयोग प्रॉडक्शनचा नाटकांचा धमाका:** सुयोग प्रॉडक्शन तीन दर्जेदार नाटके घेऊन येते आहे. **१) हास्यपंचमी:** गेल्या ५० वर्षांतील विविध विनोदी नाटकांवर आधारित एक धम्माल नाटक. यात तुम्हाला पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे, वसंत सबनीस, संतोष पवार यांसारख्या मातब्बर लेखकांनी लिहिलेल्या नाटकांचे रंग दिसतील. **२) "काय सांगू बाई"**
**३) शेखर ढवळीकर लिखित सामाजिक नाटक**: ह्या नाटकांमध्ये कोण काम करणार आहे माहितीये? मराठी रंगभूमीवरील एकापेक्षा एक सरस कलावंत: **दिलीप प्रभावळकर, विक्रम गोखले, प्रशांत दामले, सचिन खेडेकर, प्रदीप पटवर्धन, भरत जाधव, विजय चव्हाण, सुप्रिया पिळगावकर, नीना कुलकर्णी, सुहास जोशी, शिवाजी साटम, विजय केंकरे, अलका कुबल, सविता प्रभुणे.** आणखीनही अनेक आहेत पण इथे जागा कमी पडेल. ह्या साऱ्यांना एकाच रंगमंचावर पाहण्याचा आणि त्यांचा विलक्षण ताकदीचा अभिनय 'याचि देही याचि डोळा' अनुभवण्याचा असा ही मणिकांचन योग जमून आला आहे तो अजिबात सोडू नका.
**"अवघा रंग एकचि झाला":** हे एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असे संगीत-नाटक आहे. ह्या नाट्यलेखनाकरिता फिलाडेल्फियावासी **डॉ. मीना नेरुरकर** ह्यांनी महाराष्ट्र राज्य व्यावसायिक नाट्यस्पर्धेत तिसरे पारितोषिक पटकावले. ह्या नाटकामुळे रंगभूमी व गायकीपासून दूर गेलेल्या पद्मश्री प्रसाद सावकार यांचे रंगभूमीवर पुनरागमन झालेले आहे. त्यांच्यासमवेत पं. राम मराठे यांची नात स्वरांगी मराठे, प्रभाकर पणशीकरांचे सुपुत्र व किशोरीताई आमोणकरांचे शागिर्द पं. रघुनंदन पणशीकर सहभागी होतील. तर जुन्या-नव्याचा असा मिलाफ साधणारे हे नाटक रसिकांना मंत्रमुग्ध करेल यात शंकाच नाही.
**"तरुणाई":** 'झी सारेगमप'च्या अंतिम फेरीतील स्पर्धक झकास मराठी गाण्यांचा हा कार्यक्रम सादर करतील. गायक आहेत सई टेंभेकर, सायली ओक, मंगेश बोरगावकर, अमोल बावडेकर.
**"अमृतगाथा":** एक लोकभक्तीपर रचना. सादरकर्ते: 'घाशीराम कोतवाल', 'जैत रे जैत' फेम चंद्रकांत काळे, माधुरी पुरंदरे, प्राची दुबळे.
**"संगीत त्रिवेणी":** भक्तिगीतांचा नजराणा घेऊन येत आहेत शौनक अभिषेकी, राहुल देशपांडे, आणि उपेन्द्र भट.
**"तालवाद्य त्रिगलबंदी":** तीन पंडित, तीन वाद्ये आणि अगणित सूर - पं. सतीश व्यास, पं. विजय घाटे, पं. भवानी शंकर.
**शब्दांना बोलकं करणारं "गाणारं व्हायोलिन":** प्रख्यात व्हायोलिन वादक **पं. प्रभाकर जोग** सादर करतील भक्तिरसात चिंब भिजलेली भक्तिगीते.
**गझलनवाज भीमराव पांचाळ यांच्या मराठी गझला** रसिकांना गुंग करून सोडतील.
**“लोकधारा”:** शाहीर विठ्ठल उमप आणि ढोलकीसम्राट पांडुरंग घोटकर सादर करतील महाराष्ट्राची लोकगीते.
गेल्या सहा दशकांपासून आपल्या सुरेल आवाजाने जगभरच्या संगीतरसिकांना झुलवणारी, नाचवणारी अशी **एक अफलातून गायिका** आपल्या गाण्याने कन्व्हेन्शन सेंटर हालवून सोडणार आहे. अधिक माहिती पुढील अंकात...
ह्या कन्व्हेन्शनचे **प्रमुख पाहुणे** असणार आहेत **महान समाजसेवक पद्मभूषण श्री. अण्णा हजारे**. राळेगणसिद्धीचा देवमाणूस म्हणून अण्णांची केवळ महाराष्ट्रातच नाही तर सगळ्या भारतभर ख्याती आहे. असा परखड विचारांचा लोकसेवक आपल्यामध्ये उपस्थित असणार हे आपले अहोभाग्याच नाही का?

**14th Brihan Maharashtra Convention, Philadelphia**
July 2-5, 2009, Pennsylvania Convention Center

**१४ वे बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, फिलाडेल्फिया**
जुलै २ ते ५, २००९, पेन्सिल्व्हेनिया कन्व्हेंशन सेंटर

# Registration Form

***You are welcome to use this Paper Form if you have no Internet access. We encourage ON-Line Registration from our website www.bmm2009philadephia.org***

| Primary Registrant (Payee) Information *Note: All information is mandatory.* | | | |
|---|---|---|---|
| First Name | Middle Initial | Last Name | Email Address |
| Street Address | | City | State/ Province, Zip Code |
| Country | Home Phone | | Additional Phone (if any) |

***Please enter the information for all the attendees: (include primary registrant)***

| First Name | Last Name | Gender | Age | First Name | Last Name | Gender | Age |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | | | | 5) | | | |
| 2) | | | | 6) | | | |
| 3) | | | | 7) | | | |
| 4) | | | | 8) | | | |

| *Registration Items* | *USD Price* | | *Numbers* | | *Total Price (USD)* |
|---|---|---|---|---|---|
| **BMM Main Convention (July 3 – 5, 2009)** *Note: For Children under 3, there is No charge and No child care is provided.* | | | | | |
| Adults ( Age18 years and above) | $150 | x | | = | |
| Child ( Age 3 – below 18 years) | $99 | x | | = | |
| | | | | | |
| **CONFERENCES (July 2, 2009)** *Note: Lunch Included in most conferences except 55+ conference.* | | | | | |
| Indus Business Conference *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $150 | x | | = | |
| Expo Business Forum (July 3 – 5) *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $250 | x | | = | |
| Dental (C E Credits) *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $150 | x | | = | |
| Medical (C E Credits) *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $150 | x | | = | |
| OT/PT (C E Credits) *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $100 | x | | = | |
| Pharmacy (C E Credits) *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $100 | x | | = | |
| Veterinary Medical *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | $100 | x | | = | |
| Graceful Aging for 55 + *Attendees (Please Circle) 1 2 3 4 5 6 7 8* | Free | | | | |
| **BANQUET & ENTERTAINMENT (July 2, 2009)** *Note: Limited Childcare Available – Pay On Site* | | | | | |
| Banquet Dinner (sit down, restaurant style service) | $50 | x | | = | |
| Grand Hindi Program by Asha Bhosle & Sudesh Bhosle.. | | | | | |
| VIP Seating | $200 | x | | = | |
| General Seating – Category 1 | $100 | x | | = | |
| General Seating – Category 2 | $50 | x | | = | |
| **FOOD PACKAGES** *Note: The package includes 3 Breakfasts, 3 Lunches and 2 Dinners valid for July 3-5, 2009* | | | | | |
| Meal Package (No charge for children below 5) | $100 | x | | = | |
| *Would you like to have "Ekadashi Faral" on Friday July 3* ☐ YES ☐ NO | | | | | |
| **SUBSCRIPTION** BMM Vrutta Newsletter Mailing Address is same as Billing Address? ☐ YES ☐ NO | | | | | |
| BMM Newsletter subscription for US & Canada Only | | | | | |
| Electronic Copy for two years | $20 | x | | = | |
| Paper Copy for two years | $40 | x | | = | |

| | |
|---|---|
| **(A) Sub Total USD** | |
| If you are Not a donor already and would like to donate, add the donation amount here **(B) Donation**<br>*Call* Jagdish Vasudev (732) 355-1515 or Mangesh Honwad (610) 388-0651 *to know more about Donation Packages* | |
| If you are a donor already, please write your Donation Amount USD____________<br>*Please call* Jagdish Vasudev (732) 355-1515 or Mangesh Honwad (610) 388-0651 *to know your Donor's Benifit*<br>**(C) Less Donor's Benefit USD** | |
| **(Add A and B. Subtract C) Grand Total USD** | |

## PAYMENT & MAILING INSTRUCTOINS

Please make checks in US Dollars payable to **"Marathi Mandal of Philadelphia, Inc".**
Please Mail the checks by regular mail (not certified mail) to: **PMM c/o Satish Deshmane, 9 Camelot Way, Harleysville, PA 19438**
Registration number will be emailed after processing this form and payment thru 'paybycheck' system. $25 fee will be charged for returned checks.
Terms and conditions are at website www.BMM2009Philadelphia.org. Mailing this form with payment constitutes acceptance of these terms and conditions.

## HELPLINE (For Paper Form Registration Only)

7 to 10 pm (EST) only Please call Mr. Satish Deshmane (215) 368-3813

## HOTELS RESERVATION

Please wait till you get the registration number and Hotel booking instructions in the e-mail or snail mail. The Hotel rooms can be booked at BMM's discounted rate only with a valid registration number.